# राशिभविष्य - फेब्रुवारी, २०१९.

**दादा दामले ( dadadamle@gmail.com )**

==================================================================

**(१) मेष -** सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अतिशय अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असण्याची दाट शक्यता वाटते. तसे असेल तर कोणाचाही धाक, दडपण, समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या तर तो स्वतः:चा अपमान वाटून अतिशय संताप येत असावा, असे वाटते. या राशीची लहान मुले तर अतिशय हूड, खोडकर झाली असण्याची शक्यता वाटते. असे असले तरी या राशीच्या प्रथम स्थानी असलेला हर्षल ग्रह चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल असतो. . पण या महिन्याच्या पाहिल्या चार दिवसांनंतर प्रथम स्थानी हर्षल बरोबर मंगळही येत असल्यामुळे नोकरदार मंडळींना तो प्रतिकुल असणार आहे. त्यामुळे हट्टी स्वभाव व मानापमान फार असल्याने अकारण श्रम, दगदग होईल व शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यता वाटते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. पण ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. किंवा वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. भाग्यस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे प्रवासाचे योग येतील. तसेच शुक्रामुळे या राशीच्या काही मंडळींना कीर्ती -प्रसिद्धी मिळणे संभवते. काहींना गुरुकृपा किंवा थोरकृपा प्राप्त होणे संभवते. काहींना सुखसमाधान मिळेल. या राशीच्या नोकरदार मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. नवे मित्र मिळतील. धनलाभ होणेही संभवते. पण केतुमुळे काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तसे काही करू नये. आहे तो व्यवसायच मनापासून करावा. लाभस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे आर्थिक व्यवहारात नुकसान, घोटाळे, विलंब होणे संभवते. काहींना कुमार्गी मित्र मिळण्याची शक्यता आहे. काहींना नैराश्य येणे संभवते. व्ययस्थानी असलेल्या मंगळामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना अनुकुल होईल. तसेच श्रीगणेश उपासना अनुकुल होईल. " ओम गं गणपतये नमः: " मंत्राचा २१ वेळा जप करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. केवळ गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने काही प्रमाणात मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींनी स्वतः:च्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. कारण या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना, अपेक्षाभंग यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेल व त्याचा परिणाम शारीरिक आरोग्यावर होण्याची दाट शक्यता आहे. काही मंडळींना एखाद्या मोठ्या आजाराला तोंड द्यावे लागेल. जपा. पण शनिसह शुक्र ग्रह असल्यामुळे धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या राहूमुळे उदार मनामुळे हातून मोठे कर्तृत्व घडेल. पण हा राहू बंधुसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेला गुरु ग्रह असल्यामुळे ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते अधिक घट्ट होतील. काहींना विवाहयोग संभवतो. नवे स्नेहसंबंध निर्माण होतील. प्रवासाचे योग येतील. ज्या स्त्रियांचा या महिन्यात प्रसूतिकाळ आहे त्यांना पुत्रलाभ होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या केतूमुळे काही मंडळीकडून " वरून कीर्तन, आतून तमाशा " अशा प्रकारचे आचरण होणे संभवते, तसेच या स्थानी असलेल्या रवि -बुध या ग्रहांमुळे महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या नोकरदार

मंडळींना नोकरीत कामाचा ताण, वरिष्ठांचा विरोध सहन करावा लागेल. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत बदल होईल. सर्व काही मनासारखे घडेल. मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. काहींना धनलाभ होईल. रवि -बुधासह नेपच्यूनही असल्यामुळे काही मंडळींच्या व्यवसायात अस्थिर स्थिती निर्माण होईल. पण मनोवैज्ञानिक आणि द्रव पदार्थ व्यापारी यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. व्ययस्थानी असलेले मंगळ व हर्षल हे दोन्ही ग्रह प्रतिकुल असून कौटुंबिक सुखात बाधा येऊ शकेल. काहींना सांपत्तिक अडचणी व वाईट प्रसंगांना तोंड द्यावे लागेल. काही मंडळींना जीवावरच्या प्रसंगाशी मुकाबला करावा लागेल जपा. शिवाय अकारण शत्रुत्व निर्माण होणे, बेअब्रूचे प्रसंग ओढवणे अशा घटना घडणेही संभवते. जपा. श्रद्धा असेल तर प्रभू रामचंद्राची उपासना करा. दररोज नियमितपणे " श्रीरामरक्षा स्तोत्रा"चे व " श्रीहनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ घरीदारी सर्व ठिकाणी प्रतिकुल परिस्थितीशी मुकाबला करण्यात व्यतीत करावा लागण्याची शक्यता दिसते. धनस्थानी असलेल्या राहूमुळे कुटुंबात कलह निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच आर्थिक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना नोकरीत मानसिक ताण, विरोध, मानहानी सहन करावी लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळे शारीरिक, मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे. काही मंडळींना संततिविषयक समस्या त्रस्त करील. नोकरीत वरिष्ठांशी व घरी वडीलधाऱ्या मंडळींशी संघर्ष होण्याची शक्यता दिसते. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात महिन्याच्या प्रथम सप्ताहात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. नंतरच्या काळात सहनशील बनून व कष्ट-परिश्रम करूनच अर्थ प्राप्ती होणे संभवते. पण या मंगळामुळे काहींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. या राशीच्या लाभस्थानी मंगळासह असणाऱ्या हर्षलमुळे आर्थिक लाभ होण्याची शक्यता असली तरी मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यात कार्यरत असणारांच्या कार्यात अपेक्षित ते घडेलच याची खात्री देता येत नाही. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. अध्यात्माची आवड असणारांना उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला गुरु ग्रह नोकरी-व्यवसायाला पूरक होईल व आरोग्यरक्षणास उपयुक्त होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेला शुक्र वैवाहिक सुख देण्यास अनुकुल आहे. जीवनसाथी कलाकार असण्याची शक्यता दिसते. युवकयुवतींचे प्रेमविवाह होतील. शुक्रासह असलेला शनि वकिली व्यवसायास अनुकुल व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे " श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्राचे " पठण करा. तसेच " ओम गं गणपतये नम:" मंत्राचा २१ वेळा जप करा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात जिभेवर ताबा ठेवून आपली मते स्पष्टपणे सांगू नयेत. कारण तुमचा अपमान होण्याची शक्यता आहे. तसे घडले तर तुमच्या मनात अपमानाचा बदला घेण्याचा विचार पक्का होईल. आणि सर्व चांगले, व्यवस्थित असलेले संबंध दुरावतील. जपा. त्याचा परिणाम अनारोग्य होण्यात होईल व वातविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. मनस्थिती अस्वस्थ राहिली तर त्याचा परिणाम वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. जपा. विशेष करून महिन्याचा प्रथम सप्ताह अधिक मनस्ताप देणारा असण्याची शक्यता दिसते. या

राशीच्या पंचम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. आर्थिक लाभ होणेही शक्य आहे. ज्या गर्भवती स्त्रियांचा प्रसूतिकाळ या महिन्यात आहे त्यांना पुत्र लाभ होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेले शुक्र-शनि ग्रह बौद्धिक, कलात्मक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना अनुकुल होतील. पण शुक्रामुळे उच्च गुणवत्ता असूनही प्रगतीसाठी योग्य संधीच मिळत नसल्याचा अनुभव येईल. त्यामुळे नैराश्य येऊन काही जण व्यसनाधीन होणेही संभवते. जपा. दशम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. पण औषध विक्रेते, तसेच यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना हा मंगळ अनुकुल होईल. महिन्याच्या प्रथम सप्ताहात शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात त्रास, मानहानी होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल होईल. नंतरच्या काळात संतति समस्या, स्वतः:चे अनारोग्य, इच्छिलेले न घडणे अशा प्रकारचे अनुभव येतील. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला नेपच्यून ग्रह पाण्यापासून धोकादायक असल्याने जलप्रवास करू नका व खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच तो विषभयकारक असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. श्रद्धा असेल तर “शिवोपासना” करा.
दररोज नियमितपणे “ ओम नमः शिवाय “ मंत्राचा एक माळ जप करा. तसेच “ शिवलीलामृत” स्तोत्राचे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या चतुर्थ स्थानी गुरु ग्रह असल्याने या राशीच्या मंडळींना . गृहसौख्य लाभेल. काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील. पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या शुक्र-शनि या ग्रहांमुळे कलात्मक बौद्धिक आवड असणारांना म्हणजे गायनवादन, चित्रकला, फोटोग्राफी, भरतकाम, विणकाम वगैरे छंदात चिकाटीने प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेले रवि -बुध -केतू हे तिन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात नोकरी व्यवसायास अनुकुल व पूरक होतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात अनारोग्य, पोटविकार, दु:ख, भांडणे अशापैकी घटना त्रस्त करण्याची शक्यता आहे, जपा. शिवाय सप्तम स्थानी नेपच्यून ग्रह असल्याने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे महिन्याच्या प्रथम सप्ताहात मूळव्याधीसारखे उष्णताविकार त्रस्त करतील. शिवाय वीज, पाणी यांपासून धोका असल्याने विजेवर चालणारी उपकरणे विचारपूर्वक व सावधानतेने हाताळा जलप्रवास करू नका. खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. महिन्याच्या उत्तरार्धात
शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप, मानहानी होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. तसेच शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना हा हर्षल प्रगतिकारक होईल. या राशीच्या व्यय स्थानी असलेल्या राहूमुळे हितशत्रूंपासून रक्षण होईल. काही जणांना अर्थलाभ होईल. काहींना परदेशवारीची संधी मिळेल.
पण हा राहू वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “ओम नम:शिवाय” मंत्राचा एक माळ जप करा. तसेच “शिवलीलामृत” स्तोत्राचे पठण करा.

**(६) कन्या -** या राशीच्या लेखकांचे लिखाण ग्रंथरूपाने प्रकाशित होण्यास काळ अनुकुल आहे. काही मंडळींना प्रवासाचे, यात्रेस जाण्याचे योग येतील. पण भावंडापैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शुक्रामुळे शेतीवाडी असणारांना त्यापासून अर्थलाभ होईल. सुखसमाधान लाभेल. पण शुक्रासह असलेल्या शनि ग्रहामुळे विविध कारणांनी गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेले रवि -बुध -केतु हे तिन्ही ग्रह प्रतिकुल असून अनारोग्य, अपमान, नोकरीत वरिष्ठांचा त्रास, प्रिय जनांपासून दुरावा, मुलांपैकी कोणाचा आजार, तर कोणाकडून दिला जाणारा मनस्ताप, विद्यार्थ्यांच्या शिक्षणात येणारे अडथळे अशापैकी घटना घडणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला रवि नोकरी-व्यवसायास पूरक होईल. मन:शांती देईल, हितशत्रू पराभूत होतील, पण काहींना हृदय विकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. बुधामुळे कार्यसिद्धी होईल, काही मंडळींना धन तर काहींना प्रसिद्धी प्राप्त होईल. पण तेथेच असलेल्या नेपच्यूनमुळे काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. तर काहींना काल्पनिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. मंगळ ग्रहामुळे या महिन्याच्या प्रथम सप्ताहात पति पत्नीत गैरसमजाने वाद, भांडणे होणे संभवते. तसेच जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या भागीदारीत बाधा येणे संभवते, जपा. नंतरच्या काळात हाच मंगळ ग्रह अनारोग्यकारक होईल व शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकाराचा आजार त्रस्त करील. काही मंडळींना मूळव्याधीचा आजार त्रस्त करील. अपघाताने हाडमोड होणे संभवते. पाणी-वीज यांपासून धोका असल्याने खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच विजेवर चालणारी साधने सावधानपूर्वक हाताळा. मंगळाबरोबर असलेला हर्षल ग्रह तर अधिकच धोकादायक आहे. जपा. या राशीच्या लाभस्थानी असलेला राहू संततिसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. तसेच तो वाममार्ग धनाचा लोभ निर्माण करील. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शक्ती देईल. म्हणून दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे"चे पठण करा.

**(७) तुळा -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अस्थिर व अतिशय भावनाशील झाली असावी असे वाटते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहिरे नैराश्य येत असावे, असेही वाटते. पण अध्यात्मात रस असेल तर या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे उपासनेद्वारे मन:शक्ती प्राप्त होणे शक्य दिसते. गूढ संशोधनासही हा नेपच्यून अनुकूल होईल. या राशीच्या धनस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील., उत्तम अर्थलाभ होणेही संभवते. व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल. शुक्र ग्रहामुळे काही मंडळींना मानाचे स्थान तर काहींना प्रतिष्ठा प्राप्त होण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना धनलाभ तर काहींना भूमिलाभ होण्याची शक्यता आहे. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. शुक्रासह असलेल्या शनि ग्रहामुळे काही मंडळींना उत्तम नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण या शनि ग्रहामुळे एखादी भावंड विषयक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. या महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रहामुळे शारीरिक अनारोग्य त्रस्त करील, कौटुंबिक त्रास सहन करावे लागतील, अनावश्यक खर्च होणे संभवते, नियोजित कार्यात दिरंगाई होणे संभवते. त्यामुळे नैराश्य येईल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर तर नोकरीत वरिष्ठांचा जाच व अपमान सहन करावा लागेलसे दिसते. काही मंडळींना मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. काही मंडळींना प्रिय जनांच्या दूरत्वामुळे होणारी मानसिक अस्वस्थता त्रस्त करील. रवि ग्रहासह असलेल्या बुध ग्रहामुळे मित्रसुख व गृहसौख्य मिळेल. पण हा बुध रविसह पंचम स्थानी गेल्यावर

संतती व जीवनसाथीकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. महिन्याच्या प्रथम सप्ताहात षष्ठ स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे शारीरिक अनारोग्य त्रस्त करण्याची शक्यता आहे. दुखापत होणे, अंगावर फोड येणे, ताप येणे, रक्तविकार, हृदयविकार बळावणे, अपप्रचाराचा त्रास होणे, आर्थिक नुकसान होणे अशापैकी घटना घडण्याचा संभव आहे. जपा. मंगळ ग्रह महिन्याच्या प्रथम सप्ताहानंतर या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर तो व त्याच स्थानी असलेला हर्षल ग्रह दोघेही वैवाहिक जीवनातील सुखास प्रतिकुल होतील व भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या भागीदारी संबंधात बाधा येऊ शकेल जपा. दशम स्थानी असलेल्या राहूमुळे या राशीच्या नोकरदार मंडळींपैकी काहींना बढती, अधिकार पद, मिळू शकेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती प्राप्त होईल. दररोज नियमितपणे “ ओम गं गणपतये नमः: “ मंत्राचा २१ वेळा जप करा. तसेच “श्री गणेश अथर्वशीर्षाचे “ पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे अनारोग्य फारसे होणार नाही. शास्त्रीय संशोधन, बौद्धिक कार्यक्षेत्र, लेखन या गोष्टींना हा गुरु अनुकुल होईल. नोकरीत बढती होणेही संभवते. धनस्थानी असलेला शुक्र ग्रह कौटुंबिक सुखास अनुकुल असला तरी त्याच्याबरोबर असलेला शनि ग्रह कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करण्याची दाट शक्यता आहे. या शनीमुळे आर्थिक संकटे येणे संभवते. जपा. पण शुक्रामुळे धनलाभ झाल्यास आर्थिक चिंता फारशी होणार नाही. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल असल्यामुळे त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. कारण नंतर तो या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर त्याच्याबरोबर असलेले बुध -केतू सहजासहजी काही मिळू देणार नाहीत. त्यामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते. तसेच असह्य मनस्ताप होण्याची शक्यताही जाणवते. महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुल असल्यामुळे नैराश्य येणे संभवते. कारण अनारोग्य, मनस्ताप, कौटुंबिक त्रास यांमुळे त्रस्त व्हाल. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे महिन्याच्या प्रथम सप्ताहात मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाची आचरणविषयक समस्या अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. काही मंडळींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. पण हा मंगळ वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अनुकुल होईल. नंतरच्या संपूर्ण काळात तो या राशीच्या षष्ठ स्थानी जात असून तेथेच हर्षलबरोबर असणार आहे. हर्षल-मंगळ हे नोकरी व्यवसायास पूरक असले तरी अनारोग्यकारकच होणार आहेत. काही मंडळींना ताप येईल तर काहींना उष्णतेमुळे अंगावर फोड येणे, इजा होणे, रक्तविकार, हृदयविकार बळावणे ,अशापैकी आजार त्रस्त करतील. काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेल; तर काही मंडळींना चोरीमुळे किंवा अन्य कारणाने आर्थिक नुकसानीचा मनस्ताप अस्वस्थ करील. या राशीच्या मंडळींनी अकारण अति विचार करू नये. येथील हर्षल ग्रहामुळे काही मंडळींना डोकेदुखीचा तर क्वचित कोणास मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या राहूमुळे काहींना प्रवास योग येईल तर काहींना संततीसमस्या त्रस्त करील. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना मन:शक्ती देऊ शकेल. दररोज नियमितपणे “ श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे पठण करा, तसेच “ ओम गं गणपतये नम: “ मंत्राचा २१ वेळा जप करा. तसेच शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे “हनुमानचालिसा” स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण बुध ग्रहामुळे कोणाशी तरी शत्रुत्व येणे संभवते. तसेच हितशत्रूंपासून मनस्ताप सहन करावा लागेलसे वाटते. महिन्याच्या पूर्वार्धात आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. तसेच कुटुंबात वाद, भांडणे होणे संभवते. काही मंडळींना डोळ्याचे दुखणे त्रस्त करील. या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या शुक्र=शनि ग्रहांमुळे स्वतः:चे व जीवनसाथीचे अनारोग्य, नियोजित कार्यात येणारे अडथळे, कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे होणारे दूरत्व, अशापैकी कारणांनी अस्वस्थ वाटेल व गहिरे नैराश्य येणे संभवते. पण शुक्रामुळे काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याच्या पहिल्या सप्ताहात चतुर्थ स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे कौटुंबिक जीवनात कटकटी, वाद, गैरसमज, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. नंतर हा मंगळ या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाचे विक्षिप्त आचरण, मनाविरुद्ध वागणे, अशापैकी कारणांनी मनस्ताप होणे संभवते. या काळात या राशीच्या गर्भवती महिलांनी अकारण दगदग करू नये. काही मंडळींना राहत्या जागेची समस्या त्रस्त करणाची शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी मंगळ ग्रहासह असलेल्या हर्षल ग्रहामुळे शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण त्यासाठी शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. काही मंडळींना अंतर्ज्ञान प्राप्त होणे संभवते. या राशीच्या अष्टम सथानी असलेल्या राहूमुळे जन्मकुंडलीत योग असेल तर काहींना अचानक धनलाभ होणे संभवते, या राशीच्या व्ययस्थानी असलेला गुरु ग्रह अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारा प्रगतिकारक होईल. तसेच समाजसेवेची आवड असणारांनाही सामाजिक कार्यात प्रगती करणे सहज शक्य होईल. पण या गुरूमुळे प्रवासात त्रास होणे संभवते. तसेच कौटुंबिक जीवनात मनस्ताप, अपेक्षाभंग होणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. शिवाय शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे " हनुमानचलीसा" स्तोत्राचे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. केवळ गुरु-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. त्यामुळे मन घट्ट करून व सहनशील बनून सतत नम्रतेचे आचरण केल्यास व कोणत्याही मोहाला बळी न पडल्यास सर्व प्रकारचे आरोग्य बिघडणार नाही, व ग्रहस्थिती अनुकुल झाली की सर्व काही सुखाचेच होईल. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी मनावर ताबा ठेवून व संयमशील आचरण केल्यास खूपच सुखाचे होईल. काही मंडळींना गलितगात्र थकवा येणे संभवते. काहींना डोळ्याच्या अनारोग्याचा त्रास होणे संभवते. संयमशील आचरण न झाल्यास काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक चिंता त्रस्त करतील. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेले मंगळ व हर्षल ग्रह कौटुंबिक जीवनात वाद भांडणे, गैरसमज, असमाधानकारक घटना घडल्यास अस्वस्थ व्हाल. वास्तुसुख आभणार नाही. कोणाशी पटणार नाही. तसेच या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे मनात कपटी विचार येण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाममार्गी आचरण होणे संभवते. जपा. त्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येईल. या राशीच्या व्यय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे सतत मानहानी, मनस्ताप सहन करावा लागेल. त्यामुळे

अनारोग्य होणे संभवते. पण या राशीच्या लाभस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या विवाहेच्छूना विवाहयोग येणे संभवते. तसेच काहींच्या इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. वाहनसुख मिळेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. शिक्षणात यश मिळेल. शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील. श्रद्धा असेल तर "शिवोपासना" व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे "हनुमानचलीसा" स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव अतिशय चंचल, लहरी असा झाला असण्याची शक्यता दिसते. तसे असेल तर रवि - बुध हे दोन्ही ग्रह प्रतिकुल असल्याने सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना व होणारी मानहानी यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील व गहिरे नैराश्य येईल. त्याचा परिणाम शारीरिक अनारोग्य होण्यातही होणे संभवते. जपा. रक्तदाब, ह्रदयविकार असे आजार असणारांनी मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करणेच जरूरीचे होईल. तसे झाले नाही तर काहींना कुसंगतीची बाधा होणे शक्य आहे.जपा. महिन्याच्या पहिल्या सप्ताहात आर्थिक चिंता त्रस्त करतील. शिवाय शारीरिक उष्णता भडकून घसा, मान,दाढा, डोळे यांच्यापॆकी कशाचे तरी अनारोग्य त्रस्त करील. त्या नंतरच्या काळात परिस्थितीत सुधारणा होण्याची शक्यता दिसते. येथील मंगळ या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर अनुकुल होईल, धैर्य, हिम्मत, महत्त्वाकांक्षा वाढेल, प्रवासाचे योग येतील. या तृतीय स्थानी हर्षल असल्यामुळे दोन्ही ग्रह अनुकुल होतील व उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांच्या कर्तृत्वाची चमक दिसून येईल. काही मंडळींना परदेशवारीची संधीही मिळू शकेल. पण सतत सावधानतेने आचरण करा. इजा, दुखापत होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या राहूमुळे इतर जातिधर्माच्या
मित्रांपासून लाभ होणे संभवते. हितशत्रू पराभूत होतील. पण विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. काही मंडळींना पोटविकार त्रस्त करील. जपा. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. नोकरीत वरिष्ठ कामाचे कौतुक करतील. काही भाग्यवान मंडळींना मानसन्मान मिळण्याचे भाग्य लाभेल. काहींना नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या शुक्र-शनि ग्रहांमुळे सर्व काही मनासारखे घडेल व सुखशांति लाभेल. पण मुलांपैकी कोणाचे अनारोग्य किंवा अन्य त्रासाकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. श्रद्धा असेल तर "शिवोपासना" व "श्रीहनुमान उपासना " मन:शांती देईल. दररोज नियमितपणे "ओम नमः: शिवाय " मंत्राचा एक माळ जप करा. तसेच "हनुमानचालीसा" स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय अस्थिर झाली असण्याची शक्यता दिसते. तसे असेल तर त्यामुळे विचित्र आचरण होणे, अविचाराने खर्च होणे, फटकळ बोलणे, त्यामुळे नकळत समोरच्याचा अपमान होणे असे घडत असले पाहिजे. या हर्षल बरोबर मंगळही असल्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकाराचे अनारोग्य होणे संभवते. त्यात भर म्हणून अनपेक्षितपणे आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्याची चिंता त्रस्त करील. द्यावयाचे ते द्यावेच लागेल, पण यावयाचे ते येणे मात्र होणार नाही. या राशीच्या पंचम स्थानी राहू असल्यामुळे संततीविषयक समस्या त्रस्त करील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. असे असले तरी हा राहू कमिशन, दलालीवर व्यवसाय करत असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच

अनुकुल व लाभदायक होईल. त्यामुळे काही मंडळींना बढती, काहींना मानाचे स्थान, काहींना अर्थलाभ तर काहींना कीर्ती, प्रसिद्धी मिळण्याची शक्यता दिसते. नवे मित्र मिळतील. सुखसमाधान लाभेल.

पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती मनस्ताप देणारी असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या शुक्र-शनि ग्रहांमुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांना काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. पण लोखंड, कोळसा व्यापारी आणि वकिली सल्लागारीसारखे व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे प्रगती करणे व मन:शांती मिळविणे शक्य होईल. काहींना प्रवासाचे योग येतील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयांची उपासना मन:शक्ती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे”चे पठण करा. तसेच श्रीगणेश उपासनाही अनुकुल होईल. दररोज स्नानानंतर २१ वेळा “ ओम गं गणपतये नमः;” मंत्राचा जप करा.

=====ooooo0ooooo=====